**" तबला चिल्ला " २०२५  - अहवाल**

अल्पारंभा कल्चरल फौंडेशन आणि कुसुमाग्रज प्रतिष्टान प्रस्तुत आणि SWS Financial Solutions Pvt. Ltd. यांच्या मदतीने आदिताल तबला अकादमी आयोजित तबला चिल्ला २०२५ हा महोत्सव फेब्रुवारी २०२५  मध्ये संपन्न झाला. गेल्या 10 वर्षांपासून नाशिकमध्ये तबला चिल्ला या अनोख्या महात्सवाचे आयोजन आदिताल तबला अकादमी करत असते. तबला चिल्ला एक अनोखा महोत्सव असे संबोधण्याचे मुख्य कारण म्हणजे या कार्यक्रमासाठी लागलेले सर्वांचे मदतीचे हात हे कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता कायमच सरसावलेले असतात. यामध्ये अनेक संस्था आणि त्या संस्थेचे मान्यवर यांची अतिशय मोलाची अशी साथ हि नेहमीच महोत्सवाचे वैशिष्ट ठरलेले आहे.

याही वर्षी तबला चिल्ला २०२५  हा महोत्सव नाशिक मध्ये फेब्रुवारी महिन्यात ०७, ०८ आणि ०९ फेब्रुवारी रोजी साजरा झाला. ३ दिवस आणि ४ सत्र अशी या महोत्सवाची बांधणी होती. शुक्रवार संध्याकाळ, शनिवार संध्याकाळ आणि रविवार सकाळ आणि संध्याकाळ अशी कार्यक्रमाची रूपरेषा होती.

दीपप्रज्वलन आणि मान्यवरांचे सत्कार करून या महोत्सवाची सुरवात झाली. या उदघाटन प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.

ज्येष्ठ तबला वादक पंडित नाना मुळ्ये

ज्येष्ठ तबला वादक पंडित ओंकार गुलवाडी

ज्येष्ठ तबला वादक पंडित राम बोरगांवकर

ज्येष्ठ तबला वादक पंडित सुधाकर पैठणकर

SWS Financial Solutions Pvt. Ltd.  चे CEO श्री रघुवीर अधिकारी

SWS Financial Solutions Pvt. Ltd.  च्या डायरेक्टर सौ मनीषा रघुवीर अधिकारी

शब्दमल्हार प्रकाशन संस्थेचे श्री स्वानंद बेदरकर

कुसुमाग्रज प्रतिष्ठान चे श्री लोकेश शेवडे

कुसुमाग्रज प्रतिष्ठान चे कार्यवाहक श्री मकरंद हिंगणे

आदर्श लर्निंग सेंटर चे संचालक श्री आचार्य सर

तबला चिल्ला महोत्सवाचे समन्वयक श्री अविराज तायडे

माजी सभापती आणि विद्यमान नगरसेवक श्री शाहू खैरे

या वर्षीचा तबला चिल्ला हा महोत्सव नाशिकचे ज्येष्ठ तबला वादक **कै. पंडित कमलाकर वारे आणि जगप्रसिद्ध तबला वादक उस्ताद झाकीर हुसेन** यांच्या पवित्र स्मृतीस हा तबला चिल्ल्ला २०२५ समर्पित करण्यात आला.

श्री अविराज तायडे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. श्री रघुवीर अधिकारी यांनी प्रास्ताविक केले.

तबला चिल्ला या महोत्सवाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी श्री जयेश कुलकर्णी यांनी पार पाडली.

ऐश्वर्या वारे यांनी कलाकारांचे स्वागत आणि ओळख अशी अतिशय महत्वाची जबाबदारी पार पडली.

या महोत्सवासाठी नाशिक आणि नाशिक च्या बाहेरून अनेक तबला वादक आणि रसिक श्रोते उपस्थित होते.

पंडित नाना मुळ्ये , पंडित ओंकार गुलवाडी , पंडित राम बोरगांवकर,

पंडित सुधाकर पैठणकर, पंडित किशन रामडोहकर , तबला वादक श्री माधव वर्तक, तबला वादक श्री नितीन बर्वे, गायक श्री शंतनू गुणे, सौ, कन्या गुणे, तबला वादक श्री गिरीश पांडे, तबला वादक श्री नितीन पवार, श्री शाहू खैरे.

सादरीकरणाच्या सुरवातीला SWS Financial Solutions Pvt. Ltd. च्या डायरेक्टर सौ मनीषा अधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सादरीकरणाची सुरवात आदिताल तबला अकादमीचा ज्येष्ठ शिष्य श्री दिगंबर सोनवणे यांच्या वादनाने झाली.

सादरीकरणाची रूपरेषा -

## शुक्रवार दिनांक ०७.०२.२०२५ संध्याकाळ ५.३० वाजता

**दिगंबर सोनवणे - नाशिक**

**मनोज पाटीदार – भोपाळ**

**प्रसिद्ध संवादिनी वादक पंडित सुधीर नायक आणि पंडित अनिश प्रधान - विशेष सादरीकरण ठुमरी आणि दादरा**

## शनिवार दिनांक ०८.०२.२०२५ संध्याकाळ ५.३० वाजता

**रसिक कुलकर्णी – नाशिक**

**कुमार कृष्णाग हरिहरन – मुंबई**

**श्री अजिंक्य जोशी – पुणे**

**सहवादन श्री नवीन शर्मा आणि श्री रूपक देसाई - मुंबई**

रविवार दिनांक ०९.०२.२०२३ सकाळ ९.३० वाजता

**सहवादन श्री संकेत फुलतानकर आणि सौरभ ठकार - नाशिक**

**श्री संकेत आचार्य – अमेरिका**

**श्री सिद्धिविनायक पैठणकर – पुणे**

**पंडित आदित्य कल्याणपूर - मुंबई**

## रविवार दिनांक ०९.०२.२०२५ संध्याकाळ ५.३० वाजता

**अथर्व वारे - नाशिक**

**पखवाज वादन श्री शुभम उगले – मुंबई**

**पंडित संजू सहाय - लंडन**

**हार्मोनिअम साथसंगत - प्रशांत महाबळ- नाशिक , श्रीधर भट – उडपी, ज्ञानेश्वर सोनवणे – मुंबई**

**श्री. रसिक कुलकर्णी - नाशिक, श्री दिगंबर सोनवणे – नाशिक**

**उस्ताद अहमदजान थिरकवा खांसाहेब यांची वादनाची ऑडिओ क्लिप ऐकुन तबला चिल्ला २०२५ या महोत्सवाची सांगता झाली.**

या महोत्सवासाठी अनेक मदतीचे हात एकजुटीने पुढे आले त्यामध्ये -

अल्पारंभ कल्चरल सेंटर, SWS Financial Solutions Pvt. Ltd. चे श्री रघुवीर अधिकारी, सौ मनीषा अधिकारी आणि सर्व पदाधिकारी, कुसुमाग्रज प्रतिष्ठान चे श्री लोकेश शेवडे आणि श्री मकरंद हिंगणे यांचे अतिशय मोलाचे असे सहकार्य या तबला चिल्ला या महोत्सवाला लाभले.

या महोत्सवासाठी नाशिकच्या सर्व पत्रकारांची अतिशय उत्तम अशी साथ लाभली. कार्यक्रमाच्या आधी कार्यक्रम विषयी ची प्रसिद्धी आणि प्रत्येक दिवसाच्या कार्यक्रमाचा लेखा जोखा या बद्दल सर्वच वर्तमानपत्रांनी उत्तम अशी नोंद घेतली. श्री तिडके यांनी अतिशय उत्तम अशी ध्वनी व्यवस्था सांभाळली.

सर्व कलाकारांची उत्तम अशी नाश्ता आणि जेवणाची सोय श्री धनंजय मनोहर यांनी केली आणि त्याबद्दल प्रत्येक कलाकारांकडून कौतुकाची थापहि त्यांना वेळोवेळी मिळत होती.

तबला चिल्ला हा महोत्सव हा असाच सर्वांच्या मदतीने दरवर्षी दिमाखात साजरा होवो आणि या मह्त्सवाची अशीच कीर्ती संपूर्ण भारत आणि संपूर्ण जगात होवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

आदिताल तबला अकादमी ,नाशिक